# जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद.

## जाहीर सुचना

जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद तसेच धाराशिव जिल्हातील सर्व तालुका न्यायालयातील (उमरगा/लोहारा/तुळजापूर/कळंब/वाशी/भूम आणि परंडा) संपूर्ण इमारतीस पेस्ट कंट्रोल करण्यासाठी स्थानिक बाजारपेठेतून अधिकृत विक्रेत्याकडून निवीदा/टेंडर मागविण्यात येत आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे..

| Sr. No. | Treatment | Warranty period | Pest Control Area (in Sq. Feet) | Charges with Taxes (per Sq. feet) |
|---|---|---|---|---|
| 1 | Cockroach Control, Mosquitoes Control, Preservation of Books and Records, Ants Control, Spider Control, Rodent Control,Snake Control & | | | |
| 2 | Termite Control | | | |

अटी खालील प्रमाणे.

०१. दरपत्रकावर पेस्ट कंट्रोल करणेबाबत असे नमूद करणे आवश्यक आहे.

०२. निविदाधारकाने संस्था नोंदणीकृत सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र, प्रोपरायटर यांचे आधार व पॅन यांच्या छायांकित प्रती दरपत्रकासोबत सादर कराव्यात.

०३. निविदाधारकांनी जिल्हा /अधिनस्थ तालुका न्यायालयाच्या मागणी आदेशानुसार आपणास पेस्ट कंट्रोल करावे लागेल.

०४. निविदाधारकांनी आपत्कालीन व्यवस्थेत पेस्ट कंट्रोल करणे आपल्या संस्थेकडून सेवा पुरविणे शक्य नसल्यास आपल्या संस्थेने पर्यायी व्यवस्था करावी. तसे न्यायालयास लेख स्वरूपात कळविणे आवश्यक आहे तसेच पर्यायी व्यवस्था केलेल्या संस्थेस देय रक्कम आपणास दयावी लागेल. न्यायालय देयक देण्यास जबाबदार राहणार नाही.

०५. पेस्ट कंट्रोलचे काम झाल्यानंतर देयकाची रक्कम प्राप्त अनुदानानुसार अदा करण्यांत येईल.

०६. दरपत्रके ही जाहीर टेंडर नोटीस प्रसिध्द दिनांकापासुन म्हणजेच दि. १९.०६.२०२६ ते दि. ३०.०६.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यन्त समक्ष/ टपालाद्वारे जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद येथे प्रबंधक यांचे कार्यालयात **मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, उस्मानाबाद** यांच्या नावाने बंद लखोटयात दरपत्रक सादर करावेत.

०७. निविदेतील दरपत्रकामध्ये खाडाखोड/अटीचीं पुर्तता नसल्यास सदरची निविदा प्रक्रीयेतून रद्द करण्यात येईल.

०८. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

०९. सदरचे दरपत्रके मंजुर करण्याचा अगर कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, उस्मानाबाद यांनी स्वत:कडे राखुन ठेवलेला आहे.

आज दिनांक १९.०६.२०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली असे.

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद.
(आदेशावरून)

जा.क्र. रोविले/४७०९/२०२६.
दिनांक १९ जुन, २०२६

याची एक प्रत -

०१. सर्व अधिक्षक/सहायक अधिक्षक आस्थापना प्रमुख यांनी त्यांच्या आस्थापनेच्या नोटीस बोर्डवर जाहीर सूचना डकविण्यासाठी.

०२. जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद यांचे नोटीस बोर्डवर डकविण्यासाठी.

०३. जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर